بِسْمِ اللّٰہِ الرَّحْمٰنِ الرَّحِیْمِ    نَحْمَدُہٗ وَ نُصَلِّیْ عَلٰی رَسُوْلِہِ الْکَرِیْمِ    وَعَلٰی عَبْدِہِ الْمَسِیْحِ الْمَوْعُوْد
لَا اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ مُحَمَّدٌ رَّسُوْلُ اللّٰہ
دفتر مجلس انصار اللہ بھارت
Office Of The Majlis Ansarullah Bharat
Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA
Mob.9682536974, E-Mail :ansarullah@qadian.in    محلہ احمدیہ قادیان ۱۴۳۵۱۶ ضلع: گورداسپور (پنجاب)

# बदर युद्ध तसेच अनेक प्रारंभिक युद्ध मोहिमांसंदर्भात पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांचे चरित्र चित्रण व इतिहासाच्या दृष्टितून काहीं अतुलनीय प्रसंगवर्णन

सारांश प्रवचन खुतबा हजरत मिर्जा मसरूर अहमद, मसीहाचे पंचम खलीफा (अल्लाह त्यांचा सहाय्यक असो) दिनांक ९ जून २०२३, मशिद मुबारक, टिलफोर्ड यु.के.

أَشْهَدُ أَنْ لَا إِلٰهَ إِلَّا اللّٰهُ وَحْدَهُ لَا شَرِيْكَ لَهُ وَأَشْهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهُ وَرَسُوْلُهُ أَمَّا بَعْدُ فَأَعُوْذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّيْطٰنِ الرَّجِيْمِ۔
بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِيْنَ۔ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ مٰلِكِ يَوْمِ الدِّيْنِ۔ إِيَّاكَ نَعْبُدُ وَإِيَّاكَ نَسْتَعِيْنُ۔ اِهْدِنَا الصِّرَاطَ الْمُسْتَقِيْمَ۔ صِرَاطَ الَّذِيْنَ أَنْعَمْتَ عَلَيْهِمْ غَيْرِ الْمَغْضُوْبِ عَلَيْهِمْ وَلَا الضَّآلِّيْنَ۔

स्थलांतरानंतर उद्भवलेली परिस्थिती, बदरच्या लढाईची कारणे, मक्केतील विरोधींच्या कारस्थान आणि त्यांचे षडयंत्र रोखण्यासाठी पवित्र पैगंबरांनी केलेल्या कारवाया यांचा आधीच उल्लेख झाला होता. बदरच्या युद्धापूर्वी काही सिरयाः (पवित्र पैगंबरविणा युद्धासाठी गेलेले पथक) आणि गझवात (पवित्र पैगंबरांच्या सोबत युद्धासाठी गेलेले पथक) झाले होते. आणि मक्केच्या विरोधींनी युद्धासाठी जी तयारी केली होती, त्याचा मी आज उल्लेख करेन. इन्शाल्लाह

पवित्र पैगंबर मुहम्मद (स.), यांनी रमजान एक हिजरीमध्ये हजरत हमजाच्या नेतृत्वाखाली एक पथक सिरयाः म्हणून पाठवले होते, ज्याला सैफूल बहर या नावाने देखील संबोधले जाते. ध्वज पांढरा होता, आणि अबू मुर्सद ध्वजवाहक होते आणि पवित्र पैगंबरचे काका हजरत हमजा बिन अब्दुल मुत्तलिब यांना या मोहिमचे प्रमुख बनवण्यात आले होते. तीस प्रवासी घोडेस्वार त्यांच्यासोबत होते. ऐसच्या ठिकाणी अबू जहलच्या नेतृत्वाखाली सीरियातून येणाऱ्या पथकाशी त्यांचा सामना झाला. दोन्ही संघ युद्धासाठी सज्ज झाले परंतु बनू सूलैमच्या प्रमुखाने समेट घडवून आणले आणि दोन्ही संघ परत गेले.

त्यानंतर सिरयाः उबेदाह बिन हारिस आहे. शव्वाल १ हिजरीमध्ये पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांनी हजरत उबेदाह बिन हारिस (र.ज.) यांना ६० मुहाजिरांसोबत सनियतुल मरअतकडे पाठवले, जिथे ते अबू सुफयान आणि त्याच्या दोनशे घोडेस्वारांना रणांगणात भेटले. दोन्ही बाजूस काहीं वेळासाठी बाणयुद्ध सुरू झाले; परंतु औपचारिक लढाई झाली नाही. मुस्लिम आणि काफिर यांच्यात यापूर्वी कधीही तिरंदाजीची लढाई झाली नव्हती. मुस्लिमांच्या वतीने हजरत साद बिन अबी वक्कास यांनी पहिला बाण मारला, जो इस्लामिक इतिहासातील पहिला बाण होता आणि ज्याचा हजरत साद यांना अभिमान होता. त्यानंतर दोन्ही पक्ष आपापल्या भागात परतले.

त्यानंतर सिरयाः हजरत साद बिन अबी वक्कास एक किंवा दोन हिजरी मध्ये घडले. पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांनी हजरत साद बिन अबी वक्कास (र.ज.) यांना कुरैश व्यापारी काफिला रोखण्यासाठी वीस जणांचा प्रमुख करून पाठवले आणि त्यांना खरार खोऱ्याच्या अलीकडे

थांबवण्याचा आदेश दिला गेला. परंतु त्याठिकाणी पोहोचण्याआधीच तो ताफा तिथून पुढे सरकला होता म्हूणन ते कोणत्याही संघर्षाविणा परतले.

त्यानंतर विदानची लढाई सफर दोन हिजरीमध्ये झाली. पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) साठ-सत्तर मुहाजिरांसह विदानला गेले. इतिहासकार इब्न सादच्या मते, ही पहिली लढाई आहे ज्यात पवित्र पैगंबर स्वतः सामील झाले. पवित्र प्रेषितांनी हजरत साद बिन उबादा यांना मदिना मध्ये प्रभारी पद दिले होते. पैगंबरांचा उद्देश कुरैश व्यापारी काफिला थांबवण्याचा होता, परंतु ते त्यांच्या आगमनापूर्वीच निघून गेले होते. त्यांनी बनू झमराचा प्रमुख, मक्शी बिन अमर जमरी याच्याशी एक शांतता करार केला, ज्यामध्ये अशी अट होती की, दोन्ही संघ एकमेकांवर हल्ला करणार नाहीत आणि कोणत्याही संघाच्या शत्रूला पाठिंबा देणार नाहीत. या प्रवासात ते पंधरा दिवस मदिनेबाहेर राहिले.

बवातची लढाई रबीउल अव्वाल २ हिजरी मध्ये झाली. पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांनी हजरत साद बिन मुआझ यांना मदिनाचे अमीर म्हणून नियुक्त केले आणि दोन साथीदारांसह ते कुरैशचा ताफा थांबवण्यासाठी निघाले. उमाय्या बिन खलफ व्यतिरिक्त, शंभर कुरेशी आणि २,५०० उंट या काफिल्यात होते. बवात येथे पोहोचल्यावर, पवित्र पैगंबर यांचा कोणाशीही सामना झाला नाही आणि ते परत मदिना आले. यावेळी हजरत साद बिन अबी वक्कास यांनी हाती घेतलेला ध्वज पांढऱ्या रंगाचा होता.

गझवा उशैराः पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांना माहिती मिळाली की कुरैशांचा एक व्यापारी काफिला मक्केतून रवाना झाला आहे आणि मक्केच्या लोकांनी आपली सर्व मालमत्ता त्यात गुंतवली आहे त्यातून होणाऱ्या नफ्याद्वारे ते मुसलमांनाशी युद्ध करणार हे अपेक्षित होते. जमादी-अल-सानिया २ हिजरी मध्ये, ते दीड ते दोनशे लोकांस घेऊन निघाले, जेव्हा ते उशैराला पोहोचले तेव्हा त्यांना कळले की काफिला काही दिवसांपूर्वीच निघून गेला आहे. त्यांनी काही दिवस राहून बनू मदलज आणि बनू झमरा यांच्या मित्रपक्षांशी शांतता करार केला आणि मदिनेला परतले. सिरियातून परतल्यावर कुरैशांच्या त्याच काफिल्याचा त्याने पुन्हा पाठलाग केला आणि बदर युद्धाची सुरुवात झाली.

गझवा बदर अलउला(प्रथम): पवित्र पैगंबर मुहम्मद (स.), उशैराच्या मोहिमेतून परत आले तेव्हा दहा दिवसही उलटले नव्हते, तेव्हा कुर्झ बिन जाबीरने मदिनाच्या कुरणांवर हल्ला केला. पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांनी हजरत जैद बिन हारीस यांना आपला उपप्रमुख नियुक्त करून त्यांचा पाठलाग करायला गेले आणि सुफवान खोऱ्यात पोहोचले, परंतु कुर्झ बिन जाबीर वेगाने पुढे गेले आणि तिथपर्यंत ते पोहोचू शकले नाहीत, म्हणून पैगंबर (स.) मदिनेला परतले. याला बदल अलउला या नावाने प्रसिद्ध केले जाते कारण बदरच्या एक ठिकाणापर्यंत म्हणजे सफवान पर्यंत मुस्लीम सैन्य पोहोचले होते.

हजरत मिर्झा बशीर अहमद साहिब यांनी कुर्झ बिन जाबीर यांच्याबद्दल वर्णन करतात की कुर्झबिन जाबीरचा हा हल्ला काही एखादा साधा बेदुइन दरोडा नव्हता, तर नियोजितपणे तो मुस्लिमांविरुद्ध कुरैशांनी कट रचला होता, आणि कदाचित त्यांचा हेतू पवित्र प्रेषित (स.) यांना हानी पोहोचवण्याचा होता. पण मुसलमानांना सावध पाहून ते उंटांवरील क्षुल्लक वस्तूंची लूटपाट करून निघून गेले. याघटनेतून हे दिसून येते की त्यांचा उद्देश मदीनावर छापा टाकून मुस्लिमांचा नाश करण्याचा होता. हे देखील लक्षात घेतले पाहिजे की या घटनेपूर्वीच मुस्लिमांना जिहाद करण्याची

मुभा देण्यात आली होती आणि त्यांनी स्वसंरक्षणाच्या कल्पनेने त्यासंबंधी प्राथमिक कारवाई सुरू केली होती, परंतु आतापर्यंत कोणतीही हानी किंवा जीवितहानी त्यांच्याकडून झालेली नव्हती. परंतु कुर्झबिन जाबेरच्या हल्ल्यामुळे मुस्लिमांचे नुकसान झाले होते. आणि जणू मुस्लिमांनी कुरैशांचे आव्हान स्वीकारल्यानंतरही व्यावहारिकरित्या काफिरांनीच युद्धाची सुरुवात केली.

सिरिया अब्दुल्लाह बिन जहश (र.ज.) मक्केजवळील नखला वादी येथे घडले. याविषयी असे लिहिले आहे की पवित्र प्रेषित (स.) यांनी हजरत अब्दुल्ला बिन जहश (र.ज.) यांना रजब महिन्यात आठ मुहाजिरीनसह पाठवले. हजरत साद बिन अबी वक्कास आणि हजरत उतबा बिन गझवान यांचे उंट बेपत्ता झाले, ते शोधत मागे राहिले आणि बाकीचे सर्वजण नखला येथे पोहोचले. मक्केच्या कुरैशांनी तिथे मुस्लिमांना पाहून घाबरले. तो पवित्र महिन्यातील रजब महिन्याच्या शेवटचा दिवस होता (पवित्र महिने ते निर्धारित केलेले इस्लामी महिने आहेत ज्यामध्ये हिंसा वा हत्या करणे वर्ज्य आहे). अशा नाजूक परिस्थितीत जेव्हा विरोधी आमच्या विळख्यात आले आहेत त्यांना सोडणे हे दुरुस्त नाही, असा सल्ला त्या मुहाजिरीन नी केला आणि मग कुरैशांवर हल्ला करून त्यांचा एक सरदार अमर बिन हद्रमी याला ठार मारले. हजरत अब्दुल्ला बिन जहश हे दोन कैदी आणि उंट घेऊन पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या सेवेत मदिनेला आले. पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) म्हणाले, ''मी तुम्हाला पवित्र महिन्यात लढण्याचा आदेश दिला होता का! आणि त्यांनी कोणतीही वस्तू स्वीकारण्यास नकार दिला. सर्वशक्तिमान अल्लाहने मुस्लिमांना सांत्वन देण्यासाठी सुरह अल-बकराः ची आयत २१८ अवतरीत केली. यामुळे जिथे मुस्लिमांना दिलासा मिळाला, तिथे कुरैश देखील काहीसे थंड झाले कारण त्यांना हे माहित होते की आता प्रकटीकरण झाले आहे. नंतर, हजरत साद बिन अबी वक्कास आणि हजरत उत्बाह बिन गझवान सुरक्षित परत आल्यावर, पवित्र प्रेषित (स.) यांनी कुरैशच्या दोन कैद्यांना खंडणीसह मुक्त केले.

गझवा बदर अल-कुब्राच्या युद्धाचे वर्णन पवित्र कुरआनमध्ये यौमुल फुरकान (निर्णायक दिवस) या नावाने संबोधले आहे. हजरत खलिफातुल मसीह अल-अव्वाल (र.ज) सांगतात की पैगंबराचा फुरकान हा बदरच्या युद्धाचा दिवस होता ज्या दिवशी विरोधकांचे शक्तिशाली नेते मरण पावले आणि मुस्लिमांना विजय आणि वर्चस्व प्राप्त झाले. हजरत खलीफत अल-मसीह अल-अव्वाल (र.ज.) फुरकान शब्दाचा अर्थ स्पष्ट करताना दुसऱ्या ठिकाणी म्हणतात. पवित्र कुरआनपासून मला या शब्दाचे अन्वयार्थ हे समजले आहे की, फुरकान हे त्या विजयाचे नाव आहे ज्याच्या पराभवाने विरोधींची कंबर तुटली, ते शक्तिहीन आणि निःसंशय तो बदरचा दिवस होता.

या लढाईला बदर सानियाह, बदर अल-कुब्रा, बदर अल-उझमा आणि बदर अल-किताल असेही म्हटले जाते. पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांना ही खबर मिळाली की अबू सुफयान कुरैशच्या प्रचंड पथकासोबत ज्यामध्ये हजार उंट होते आणि कुरैशांचे मोठे भांडवल होते आणि त्यात चाळीस किंवा सत्तर पुरुष होते, येत आहे. हा तोच काफिला होता ज्याचा पाठलाग करताना पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) अगोदर निघाले होते. या मोहिमेसाठी ते जमादी अल-अव्वल किंवा जमादी अल-आखीर २ हिजरी रोजी निघाले. काही अज्ञानी लोक असा आक्षेप लावतात की मुस्लिमांनी ही मोहीम लुटण्यासाठी केली होती, परंतु हजरत मिर्झा बशीर अहमद साहेब, यांनी सिरत खातमुन्नबिय्यीन (स) मध्ये नमूद केले की, या ताफ्याला रोखण्यासाठी केलेले कष्ट हे अजिबात आक्षेपार्ह नव्हते कारण हा एक विलक्षण ताफा होता आणि त्याचा नफा मुस्लिमांच्या विरोधात वापरला जाणार होता. त्यामुळे इतिहास सिद्ध करतो की त्याचा नफा मुस्लिमांच्या तयारीसाठी खर्च

करण्यात आला होता आणि याचा नफा ओहद च्या युद्धमध्ये खर्च करण्यात आला. म्हणून याला रोखणे हे युद्धनितीचा एक भाग होता.

पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांनी हजरत तलहा बिन उबैदुल्ला आणि हजरत सईद बिन जैद यांना या काफिल्याची माहिती प्राप्त करण्यासाठी पुढे पाठवले. जेव्हा अबु सुफयानपर्यंत ही बातमी पोहोचली की पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) आपली सेनासह आमच्यावर हल्ला करण्याच्या उद्देशाने येत आहेत, तेव्हा तो खूप घाबरला आणि त्याने आपल्या एका संदेशवाहकाला ही बातमी देण्यासाठी मक्केला जाण्यास सांगितले आणि तो स्वतः (अबू सुफयान) बदरला सोडून वेगाने पुढे निघाला.

या संदर्भात, पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) ची आत्या अतिका बिंत अब्दुल मुत्तलिब यांनी पाहिलेला एक विलक्षित स्वप्न आहे जो नंतर खरा झाला. अबू सुफयानचा संदेशवाहक मक्केत येण्याच्या तीन रात्री आधी, तिने स्वप्नात पाहिले की एक व्यक्ती उंटवर स्वार होऊन बतहाच्या मैदानात आला, परत तो काबाची छत आणि मग अबु कबीस पर्वताच्या शिखरावर उभे राहून त्याने मोठ्या आवाजात लोकांना हाक मारली की तीन दिवसात कत्तलखाण्याला येण्याची घोषणा केली. तद्नंतर त्या व्यक्तिने एक मोठा दगड त्या पर्वतावरून खाली ढकलून दिले आणि खाली आल्यावर त्या दगडाचे तुकडे झाले. आणि मक्केत असे एकही घर शिल्लक नव्हते ज्यात या दगडाचा तुकडा पोहचला नाही. त्याने हे स्वप्न तिचे भाऊ हजरत अब्बास बिन अब्दुल मुत्तलिब यांना सांगितले आणि हळू हळू या स्वप्नाची खबर अबू जहलपर्यंत पोहोचली. अबू जहल म्हणाला की आम्ही तीन दिवस वाट पाहू, असे झाले तर ठीक आहे, नाहीतर काबामध्ये, तुम्ही अरबस्तानातील सर्वात खोटे बोलणारे लोक आहोत, असे लिहून टांगणार. यानंतर, अब्दुल-मुत्तलिबच्या स्त्रियांच्या विनंतीवरून, हजरत अब्बास अबू जहलला मारण्यासाठी काबामध्ये गेले, परंतु त्यांचे लक्ष अबू सुफियानच्या दूताच्या भयानक स्थितीकडे केंद्रित झाले, ज्याला मुस्लिमांच्या हल्ल्याबद्दल लोकांना सावध करण्यासाठी मक्केकडे पाठवले गेले होते. आणि जो सर्वत्र अबू सुफयानच्या ताफ्याला वाचवण्यासाठी घोषणा करत होता. कुरैश तर आधीच युद्धाचे निमित्त शोधत होते. या घोषणेने त्यांना इच्छित निमित्त मिळाले आणि त्यांनी युद्धाची तयारी सुरू केली.

हुजूर अनवर म्हणाले या प्रसंगाची तपशील पुढे वर्णन होईल.इन्शाल्लाह.

اَلْحَمْدُ لِلّٰہِ! اَلْحَمْدُ لِلّٰہِ نَحْمَدُہٗ وَنَسْتَعِیْنُہٗ وَنَسْتَغْفِرُہٗ وَنُؤْمِنُ بِہٖ وَنَتَوَکَّلُ عَلَیْہِ وَنَعُوْذُ بِاللّٰہِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَیِّئَاتِ
اَعْمَالِنَا مَنْ یَّھْدِہِ اللّٰہُ فَلَا مُضِلَّ لَہٗ وَمَنْ یُّضْلِلْہُ فَلَا ھَادِیَ لَہٗ وَنَشْھَدُ اَنْ لَّآ اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ وَنَشْھَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُہٗ وَرَسُوْلُہٗ،
عِبَادَ اللّٰہِ رَحِمَکُمُ اللّٰہِ اِنَّ اللّٰہَ یَاْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِیْتَآءِ ذِی الْقُرْبٰی وَیَنْھٰی عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْکَرِ وَالْبَغْیِ یَعِظُکُمْ
لَعَلَّکُمْ تَذَکَّرُوْنَ اُذْکُرُوا اللّٰہَ یَذْکُرْکُمْ وَادْعُوْہُ یَسْتَجِبْ لَکُمْ وَلَذِکْرُ اللّٰہِ اَکْبَرُ۔